**L. A. BILL No. CV OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAMLATDAR'S COURT ACT, 1906.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०५.**

**मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९०६ चा मुंबई २.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, मामलतदार न्यायालय (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ यामध्ये नवीन कलम १४अ समाविष्ट करणे.

**२.** मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९०६ चा मुंबई २.

नोटीस बजाविण्याची रीत.

"**१४अ.** (१) या अधिनियमाच्या आणि त्याअन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींस अधीन राहून, या अधिनियमाखालील प्रत्येक नोटीस, ती ज्या व्यक्तीवर बजावयाची असेल त्या व्यक्तीस किंवा तिच्या प्राधिकृत अभिकर्त्यास, एकतर, तिची प्रत देऊन किंवा स्वाधीन करून किंवा अशी प्रत, डाकेने पाठवून, बजाविता येईल, अथवा जर उपरोक्त रीतीने ती बजाविता येऊ शकत नसेल तर, त्याच्या माहित असलेल्या शेवटच्या राहण्याच्या जागी किंवा नोटीस ज्या जमिनीशी संबंधित असेल ती जमीन ज्या गावामध्ये स्थित असेल किंवा ज्या गावात उक्त जमिनीवर लागवड करण्यात येत असेल त्या गावातील एखाद्या सार्वजनिक राबत्याच्या जागी तिची प्रत लावून, किंवा इलेक्ट्रॉनिक मेल सेवेने ती बजाविता येईल.

(२) अशी कोणतीही नोटीस, त्यामध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या नावामध्ये किंवा पदनामामध्ये, किंवा कोणत्याही जमिनीच्या वर्णनामध्ये, कोणतीही चूक झाल्यामुळे, अशा चुकीमुळे मोठ्या प्रमाणात अन्याय झाला नसेल तर, निरर्थक झाली असल्याचे मानण्यात येणार नाही.".

सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २१ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २१ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(५) **पोलीस सुरक्षा.—** शेत रस्त्यांच्या किंवा वहिवाटीच्या मार्गांच्या वापराच्या प्रकरणांमध्ये, जर अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्याने, मामलतदाराच्या निर्णयाचे पालन करण्यात कसूर केली तर, अर्जदारास मोफत पोलीस सुरक्षा पुरविणे अनिवार्य असेल.".

सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २३ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २३ मध्ये,—

(एक) पोट-कलम (२अ) मधील, "डेप्युटी कलेक्टर" या मजकुरानंतर, ", उपविभागीय अधिकारी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) पोट-कलम (३) मधील, "डेप्युटी कलेक्टर" या मजकुरानंतर, ", उपविभागीय अधिकारी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

# उद्देश व कारणे यांचे निवेदन

मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ (१९०६ चा मुंबई २) हा, मामलतदार न्यायालयांचे अधिकार व त्यांच्या कामकाजाशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे एकत्रीकरण करण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियमित केला आहे. उक्त अधिनियमान्वये, कोणत्याही शेत जमिनीसाठी किंवा चराई जमिनीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहातील कोणतेही अडथळे काढून टाकण्याकरिता किंवा कोणतीही विहीर, तलाव, इत्यादींमधून होणारा पाण्याचा वापर पूर्ववत करण्यासाठी आणि ज्या व्यक्तीस, रीतसर विधिक्रमानुसार असेल त्या व्यतिरिक्त, शेत जमिनीतून किंवा चराई जमिनीतून किंवा झाडे किंवा पिके असलेल्या जमिनीतून बेदखल करण्यात किंवा त्यापासून वंचित करण्यात आले असेल त्या व्यक्तीला त्या शेत जमिनीचा किंवा चराई जमिनीचा किंवा झाडे किंवा पिके असलेल्या जमिनीचा तात्काळ कब्जा देण्याकरिता मामलतदार न्यायालयास निर्णायक अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

**२.** मामलतदार न्यायालयाच्या कामकाजामध्ये, विविध टप्प्यांवर नोटिसा काढणे आवश्यक असते. तथापि, उक्त अधिनियमात नोटीस बजावण्याच्या रीतीची तरतूद केलेली नाही. अपूर्ण पत्ते, पक्षकारांकडून नोटिसा न स्वीकारणे, इत्यादींसारख्या विविध कारणांमुळे मामलतदार न्यायालयाने काढलेल्या नोटिसा, विहित कालमर्यादेत संबंधित पक्षकारांना देणे शक्य होत नाही. परिणामी, न्यायालयीन कामकाजास विलंब होतो आणि निर्णय लांबणीवर टाकले जातात. हितसंबंधित व्यक्तींवर किंवा पक्षकारांवर वेळेत व योग्य प्रकारे नोटीस बजावल्याची खात्री करण्यासाठी आणि मामलतदार न्यायालयाचे कामकाज जलद गतीने करणे सुलभ होण्यासाठी, विशेषतः, नोटीस बजावण्याच्या रीतीबाबत तरतूद करण्याकरिता उक्त अधिनियमामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटते. नोटिसा जलद गतीने बजावण्याकरिता इलेक्ट्रॉनिक मेल सेवांद्वारे नोटीस बजावण्यासाठी देखील तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** मामलतदाराच्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शेत रस्त्यांच्या किंवा वहिवाट मार्गांच्या वापराच्या प्रकरणांमध्ये, अर्जदारांसाठी मोफत पोलीस सुरक्षेची तरतूद करणे इष्ट आहे, असे देखील वाटते.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक १० डिसेंबर, २०२५.

**चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.

ɣ

**सन २०२५ चे वि.स.वि. क्र. १०५ मामलतदार न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०२५.**
**(मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ यातील उत्तरे)**
**(सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २)**

**१. ते २२** *** *** ***

अपिलास प्रतिबंध. **२३.** (१) व (२) *** *** ***

जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार सोपवून देणे. (२-अ) जिल्हाधिकाऱ्यास या कलमान्वे त्याला प्रदान केलेले अधिकार त्याला दुय्यम असलेला कोणताही सहाय्यक जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी किंवा सहाय्यक आयुक्त याकडे सोपविता येतील.

जिल्हाधिकारी हा न्यायालय आहे असे मानणे. (३) जिल्हाधिकारी सहाय्यक जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी किंवा सहाय्यक आयुक्त याने या अधिनियमान्वये कोणताही कार्यवाही केली तर, तो न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

**२४. ते २७.** *** *** ***

अनुसूची. *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १०५]**

**[मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मुद्रणालय, नागपूर.